# प्रकरण सहावे
# सारांश आणि निष्कर्ष

## १) शेती :

काही शेतकऱ्यांच्या जमीनी या खाऱ्या पाण्याखाली गेल्या आहेत. ज्याठिकाणाहून खारे पाणी येते त्या ठिकाणी सरकारी योजनेतून बांध व्हावा जेणेकरुन पुन्हा तेथील लोकांची शेती ही उपयोगामध्ये येऊ शकेल. पडिक जमिनीमध्ये लावण्यासाठी फळझाडांची लागवड अनुदानीत स्वरूपातून मिळावी. पिक घेण्यासाठी उपयुक्त नाही पण काही जमिन ही फळबाग करण्यासाठी उपयुक्त आहे अशी जमिन शासनाने अनुदानित स्वरुपातून द्यावी. यासाठी ही योजना राबवली जावी ज्याचे योगे त्या ठिकाणच्या लोकांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न काही प्रमाणात सुटू शकेल. उत्पादन वाढवण्याच्या दृष्टीने जे शासनाकडून नविन बी बियाणे पूरविले जाते ते गरीब शेतकऱ्यांच्या पर्यंत कसे पोहचवता येईल यासाठी शासन प्रयत्नशील राहणे गरजेचे आहे. नाबार्डच्या माध्यमातून काही बांध किंवा लहान बंदारा बांधून गरीब शेतकऱ्यांना Irrigation च्या माध्यमातून शेतीला पाणी पुरवठा व्हावा.

कोकणामध्ये मोठ्या प्रमाणात पशुपालन केले जाते. त्याच्यापासून मिळणाऱ्या दुधापासून आपला आर्थिक दर्जा सुधारता येतो. दळण-वळणाची अपुरी साधणे, दुध स्टोअर करण्यासाठी जे जवळपास लागणारे चिलिंगसेंटर अशा सोयी नसल्यामुळे शेतकऱ्याचा आर्थिक दर्जा ढासळतो. जर अशा ठिकाणी दुध संस्था उभ्या केल्या तर या लोकांचा आर्थिक दर्जा सुधारण्यास मदत होऊ शकेल.

**सारांश :**

कोकणातील शेती ही पारंपारिक असल्याचे दिसून येते कारण त्या ठिकाणच्या वातावरणाचा परिणाम हा शेती घटकांवर जाणवतो. विशेष म्हणजे त्या ठिकाणी वापरण्यात येणारे बियाणे हे जूनेच असते. कारण नविन बियाणे त्या जमिनीमध्ये तग

धरुन राहात नाही. जरा राहिले तरी जास्तीत जास्त उत्पादन त्यापासून मिळत नाही म्हणून जुन्या बियाणांचा वापर केला जातो. शेतीसाठी रासायनिक खतांचा मात्र हळुहळु वापर करत असल्याचे आढळून येते. आता रासायनिक खताऐवजी लोकांचा कल हा जैविक खत वापरण्याकडे असलेला दिसून येतो.

शेती संदर्भात या ठिकाणी असे म्हणता येईल की, पारंपारिक पद्धतीच्या वापरल्या जाणाऱ्या बियाणाचा विचार केला तर, त्याच्यापासून उत्पादनात वाढ होत नाही. कारण त्या ठिकाणच्या जमिनीमधील पाण्याचा निचरा होत नाही. जमिनीतील पाणी निचरा होण्यासाठी काय करता येईल या घटकाविषयी मार्गदर्शन व्हावे त्या ठिकाणच्या इतर पिकाबरोबर काही दुसरे पीक त्या ठिकाणी येते. उदा. मसाले पदार्थ घेता यावेत. यासाठी जमिनीतील घटकांची पहाणी व्हावी. शेतीसाठी लागणारी जी खते आहेत त्यामध्ये शेणखत, रासायनिक खत यापेक्षा जैविक खताचा जास्तीत जास्त उपलब्धता व्हावी.

शेतीच्या उत्पादनासंदर्भात असे स्पष्ट करता येईल की, जुन्या बियाणाचा व नवीन बियाणांचा विचार केला तर हेक्टरी उत्पादन हे जुन्या बियाणापेक्षा नवीन बियाणाचे उत्पादन जास्त आहे. साधारण हे हे ४ ते ५ पटीने वाढ झाल्याचे (Table No. 1 & 2 ) वरुन स्पष्ट होते.

## २) फळबाग :

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील फळपिकाखालील क्षेत्रात सतत वाढ होत आहे. फळ लागवडीद्वारे शेतकऱ्यांच्या आर्थिक उत्पन्नात वाढ झाली असून त्यामुळे रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. आंबा, काजू, नारळ पिकांच्या तुलनेने सुपारीची फळपिकाखालील क्षेत्रात फारशी वाढ झाली नाही. सागर सानिध्य असलेल्या देवगड, मालवण, तालुक्यात आंबा लागवडी खालील क्षेत्र सर्वात जास्त वाढले आहे. मालवण तालुक्यातील डोंगर उतारावर काजू फळपिकाखालील क्षेत्रात झपाट्याने वाढ झाली

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

आहे. डोंगर उतारावर काजू खालील क्षेत्र झपाट्याने वाढत असून त्याद्वारे जंगलाखालील क्षेत्र कमी होत आहे. एकूण भौगोलिक क्षेत्राच्या ९५% क्षेत्र लागवडी योग्य असूनही फक्त ४७.२५ टक्के क्षेत्र लागवडीखाली आलेले आहे. आजूनही २०.७० टक्के क्षेत्रावर फळबाग लागवडीसाठी मोठ्या प्रमाणात वाव आहे.

**उपाय :**

१) फळबागांची लागवड शास्त्रोक्त पध्दतीने करावी.

२) फळबागा नेहमी स्वच्छ ठेवाव्यात.

३) शेतकऱ्यांना फळपिकावरील कर माफ व्हावा.

४) पाणी असलेल्या ठिकाणी धरणे बांधून जलसिंचनात वाढ व्हावी.

५) शेतकऱ्यांच्या मालांना मिळणारा अस्थिरपणा कमी करुन फळपिकांना योग्य भाव, किंमत मिळावी.

६) निसर्गात होत असणाऱ्या बदलामुळे पीक संरक्षणासाठी पीक विमा असावा.

७) पिकावरील आलेल्या रोगामुळे आर्थिक नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी.

८) आर्थिक दर्जा सुधारण्यासाठी त्याचबरोबर रोजगार उपलब्ध व्हावा. यासाठी उद्योगात वाढ व्हावी.

**सारांश :**

कोकणामध्ये नैसर्गिक साधन संपत्ती मोठ्या प्रमाणात आढळून येते. येथील उष्ण व दमट हवामान व जमिनी फळबागांच्या विकासाला अत्यंत पोषक आहेत. मालवण तालुक्यातील बऱ्याच खेड्यांमध्ये फळबागाच्या लागवडी क्षेत्रात झपाट्याने वाढ होत आहे. आंबा, काजू, नारळ, चिकू, कोकम आणि फणस इ. फळपिकाखालील क्षेत्रात वाढ झाली आहे. फळपीक लागवडीमुळे लोकांना रोजगारांच्या संधी उपलब्ध होत आहेत, त्यामुळे मुंबई शहराकडे जाणाऱ्यांचे प्रमाण कमी होत आहे. फळबाग लागवडीद्वारे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यास वाव

मिळत आहे. फळबाग लागवडीद्वारे पडीक जमिन लागवडीखाली येण्यास मदत होत आहे.

### ३) मासेमारी :

### १) पिरावाडी :

या वाडीतील लोकांचे जैविक साधण म्हणजे समुद्रातील व खाडीतील हंगामी मासेमारी होय. अलिकडे पूर्वी सारखे जास्त प्रमाणात मासे मिळत नाहीत. याचे कारण म्हणजे पूर्वी त्या ठिकाणी रापण व स्वतंत्र होडीवाले होते. त्यामुळे मासेमारी करण्याचे ठिकाण निश्चित नव्हते आणि त्यावेळी मासेमारी करण्यासाठी वातावरण देखील पोषक होते त्यामुळे मासे जास्त प्रमाणात मिळत होते. आता या ठिकाणी गोवा, केरळ या ठिकाणचे परशियननेट, लॉचेस हे बाहेरील मासेमारी करणारे लोक येत असल्याने या स्थानिक लोकांना पूर्वी इतके मासे मिळत नाहीत मासेमारी करण्याचे प्रत्येकांचे क्षेत्र ठरलेले असते. रापण संघ हे २५ फॅदम पर्यंत मासेमारीसाठी जातात. पण परसीयननेटमुळे त्यांना त्या ठिकाणी जाऊनसुध्दा मासे मिळत नाहीत. तेंव्हा बाहेरील परसियननेट आणि लॉचेस याच्यावर बंदी घातली तर या ठिकाणच्या स्थानिक मासेमाऱ्यांना पूर्वीसारखे जास्त प्रमाणात मोठे मासे मिळू शकतील.

त्याचबरोबर पाणी प्रदुषणामुळे पावसाचे प्रमाण कमी झाल्यामुळे मासे मिळण्याचे प्रमाण देखील कमी झाले आहे. तसेच लहान मासे पकडले जात असल्याने काही माशांच्या जाती नष्ट होत आहेत. हे सर्व स्थानिक लोकांच्या माहितीवरुन स्पष्ट करता येते.

### २) तारकर्ली (Tarkarli) :

तारकर्ली या ठिकाणी देखिल मासेमारी हाच व्यवसाय चालतो. पिरावाडी रापणसंघापेक्षा या ठिकाणचा रापण संघ हा श्रीमंत आहे असे म्हणावे लागेल. तारकर्लीला ६ रापण संघ आहेत. पिरावाडीजवळ मालवण हे शहर असल्याने त्या

ठिकाणचे लॉचेस हे पिरावाडी, देवगड पर्यंत मासेमारीसाठी जातात. त्यामुळे पिरावाडीतील रापण संघाला जास्त प्रमाणात मासे मिळत नाही तेंव्हा तो रापणसंघ जास्त प्रमाणात मासे न मिळाल्याने गरीबच राहिला आहे.

तारकर्ली या ठिकाणी मालवणचे लॉचेस जावू शकत नाहीत त्यामुळे त्यांना काही प्रमाणात मासे मिळू शकतात. तेंव्हा तारकर्ली रापण संघ हा श्रीमंत होऊ शकला.

१० वर्षापासून गोवा, केरळ या ठिकाणच्या लॉचेस यांचा या स्थानिक मच्छीमाऱ्यांना मोठ्या प्रमाणात त्रास जाणवत असल्याचे दिसून येते. याला काही प्रमाणात राजकीय नेते देखील जबाबदार असल्याचे आढळून येते.

**सारांश :**

मासेमारी संदर्भात विचार करायचे झाले तर त्या ठिकाणच्या स्थानिक लोकांना होणारा त्रास जर शासकीय माध्यमातून थांबवला गेला तर, पुन्हा स्थानिक लोकांचे राहणीमान उंचावण्यास मदत होऊ शकेल त्याचबरोबर त्यांच्या किमान गरजा सहज भागवता येतील. तेंव्हा बाहेरील परशियन याच्यावर बंदी आणावी आणि प्रजनन कालावधी मध्ये मासेमारी करण्याचे सक्तीचे बंधन असावे. यावर आळा बसल्यास तेथील आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होईल.

Time line द्वारे मासेमारी व्यवसायातील दोन ठिकाणचा तुलनात्मक विचार केला तर असे स्पष्ट होते की, रापण संघातील व्यवसाय हे हळुहळू कमी होते गेलेले दिसताहेत कारण वातावरणाचा परिणाम जैवसंसाधणावर झालेला दिसतो. तसेच बाहेरील ट्रॉलर यांचा देखील स्थानिक लोकांच्या व्यवसायावर परिणाम झालेला दिसून येतो. म्हणून काही ठिकाणच्या रापण संस्थेचे प्रमाण कमी होवू लागलेले आहे.

पारंपारिक व्यवसायाचे हळुहळु कमी होत जाणारे प्रमाण तसेच आधुनिकीकरणाचा लोकांनी केलेला स्वीकार याचा या व्यवसायावर परिणाम होऊ लागला आहे. त्यामुळे त्यांच्या पूर्वीच्या आर्थिकपेक्षा आजची आर्थिक स्थिती फारच खालावलेली दिसते.

४) **मजूरी :**

अल्पभूधारक व खंडकरी शेतमजुरांकडे मजूरी करण्यासाठी फारच कमी जमीन आहे. काही जमिन ही कोरडवाहू आहे. त्यामुळे पावसावर अवलंबून राहावे लागते. तर काही जमिनी या खाडीकडेला असल्याने व त्या खाऱ्यापाण्याखाली गेल्या असल्यामुळे त्या जमिनीतील सुपीकता नाहीशी झाली आहे. त्यामुळे काही लोकांची आर्थिकता सुधारण्यास अडचणी आलेल्या आहेत.

भूमिहीन शेतमजुरांना शेतीवरील मजुरीपासून अल्पभूधारक व खंडकरी शेतमजूर यांच्या तुलनेने जास्त उत्पन्न मिळते. एकूण शेत मजूरांना शेतीवर रोजगाराच्या संधी कमी उपलब्ध असतात. शेत मजुरांना किमान वेतन हे सर्वसाधारणपणे सर्वच ठिकाणचा विचार केला तर स्त्रिया व मुलांच्या पेक्षा पुरूषांना जास्त मिळते. अल्पभूधारक व भूमिहीन शेतमजुरांचा बहुतेकांचा खर्च हा उत्पन्नापेक्षा जास्त असतो.

वरील विवेचनावरुन शेतमजुरांच्या आर्थिक स्थितीचे दर्शन होते. आर्थिक विकासाच्या काळात शेतमजुरांची दुरावस्था का व्हावी हे नियोजनाचे अपयश होय. जास्त कष्ट करुन, कुटुंबाचे आकारमान मर्यादित ठेवून, काबाडकष्ट उपसून मुलांना शिक्षण देऊन प्रगतीच्या प्रवाहात सामील होण्याचा ते प्रयत्न करत असले तरी, ते भोवऱ्यात सापडलेले दिसतात. यादृष्टीने त्यांची परिस्थिती सुधारणा म्हणून काही उपाय सूचविलेल्या आहेत.

**उपाय :**

१) गोवा, केरळच्या परशियनवरती बंदी आणावी.

२) स्थानिक लोकांना मासे जास्त काळ टिकवण्यासाठी बर्फाची सोय व्हावी.

३) शितगृह असेल तर मासेमारी जास्त प्रमाणात करता येते.

४) होडीला लागणारे इंधन जवळपास मिळत नाही. त्याची उपलब्धी व्हावी.

५) केरळच्या मच्छीमारांना ज्यापद्धतीने इंधनामध्ये सवलत मिळते तसे आपल्याला का मिळत नाही, ती मिळावी.

६) सरकारी योजना गरीब लोकांच्यापर्यंत पोहचत नाही. त्यांची अंमलबजावणी योग्य रीतीने व्हावी.

७) व्यवसायातील पारंपारिकता दूर करण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत.

८) गाभीतामध्ये सामाजिक गतीशिलता कमी आढळते.

९) त्याचे ज्ञान हे पारंपरिक पद्धतीचे आहे.

१०) पडीक जमीनी या पिक लागवडी खाली आणता येते.

११) दुध संकलन होणे गरजेचे आहे.